# 'राजर्षी'
# विद्यार्थ्यांना आवाहन

## 'बळीराजा' 'आमची माती, आमची माणस' 'शेतकरी'

प्रिय विद्यार्थी, मित्र मैत्रिणींनो,

दरवर्षी प्रमाणे सन २०१७-१८ साठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचारांचा आरसा असलेल्या 'राजर्षी' या अंकाचे काम सुरु झाले आहे. यावर्षी जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजांवर आपण लेख लिहिणार आहात.

पावसाची अनियमितता, उन्हाळा सुरु होण्याच्या आगोदरच पिण्याच्या पाण्याचे होणारे हाल, नापिकी, जमिनीत खोलवर गेलेली पाण्याची पातळी, यातून निर्माण होणारे संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहेत. खरे तर ग्रामीण भागात राहून काबाड कष्ठ करणारा शेतकरी सरळमार्गी जीवन जगणारा माणूस आहे व इतरांना जगवणारा आहे. परंतु त्याच्या मनाचा होणारा कोंडमारा, गुदमरलेपणा आलीकडच्या काळात वाढतांना दिसत आहे. खेड्यापाड्यात राहणारा बळीराजा विस्तापित होत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा शेतकरी आहे. भारतीय संस्कृतीला इतिहास आहे. तो इतिहास खेड्यांच्या व शेतीच्या आश्रयाने निर्माण झाला आहे.

कृषी व्यवस्थेतील 'शेतकरी' हा घटक डोळ्यासमोर ठेऊन आपण आपले लेख १००० शब्दांपर्यंत लिहून जमा करावेत. या संबंधी निगडीत सर्व घटकांची दखल घेऊन आपण खालील विषयाच्या अनुशंगाने 'राजर्षी' या आपल्या वार्षिक नियतकालिकासाठी खालील विषयांवर लेख लिहावेत.

१. शेतकरी काल, आज आणि उद्या
२. शेतकऱ्यांचा असूड ते शेतकरी संपावर
३. शेतकऱ्यांना अच्छे दिन येणार?
४. शेतकरी चळवळ व शेतकरी संघटना
५. शेतकरी संपाची कारणे
६. शेतकऱ्यांचा जीवन संघर्ष
७. वाढते औद्योगिकीकरण आणि शेती समस्या
८. यांत्रिकीकरण आणि शेतकरी
९. काळ्या मातीत मातीत तिफन चालते
१०. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या

प्रस्तुत लेख शेतकऱ्यांच्या एकूणच प्रश्नांवर अवलोकन व आकलन करणारे हवेत, तर चल हातात लेखणी घेऊया व शेतकऱ्यांचे वास्तव शब्दबध्द करुया...

संपादक

प्राचार्य